सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
राष्ट्रीय सेवा योजना
गणेशखिंड, पुणे – ४११ ००७

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

डॉ. प्रभाकर देसाई
एम्.ए., पीएच् डी.
संचालक

कार्यालय क्र. : ०२०–२५६२२६८८/८९
: ०२०–२५६२२६९०/९१
: ०२०–२५६२२६९२
: ०२०–२५६९७३४१

संदर्भ : रासेयो/२०२२–२३/९१८ दि. २५/०१/२०२२

प्रति,
मा.प्राचार्य/संचालक,
रासेयो संलग्नित सर्व महाविद्यालये परिसंस्था,
पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्हा,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ.

**विषय : दि. २६ जानेवारी ते १० फेब्रुवारी २०२३ या कालावधीत लोकशाही पंधरवडा साजरा करण्याबाबत**

महोदय,

मा. उप सचिव, राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र यांच्या पत्रानुसार "लोकशाही, निवडणूक व सुशासन" या विषयावर सर्वसामान्यांना सतत शिक्षण देण्याकरिता दरवर्षी दि. २६ जानेवारी ते १० फेब्रुवारी या कालावधीत "लोकशाही पंधरवडा" साजरा करण्यात येतो. लोकशाही, निवडणूक व सुशासन या विषयावर जनजागृती करणे हा या पंधरवड्याचा उद्देश आहे.

सदर पंधरवडा यावर्षी मोठया प्रमाणावर व्हर्च्युअल स्वरूपात साजरा करण्याचा राज्य निवडणूक आयोगाचा मानस आहे. तसेच आपल्या महाविद्यालयात रासेयो स्वयंसेवकांमार्फत ७३ व ७४ व्या घटना दुरूस्ती संदर्भात जनजागृतीपर पोस्ट कराव्यात व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आगामी निवडणुकांमध्ये मोठया प्रमाणावर मतदान करण्यासाठी आवाहन करण्यात यावे. या उपक्रमांचे आयोजन करून या उपक्रमांना ट्विटर, फेसबुक, व्हाट्सॲप व इतर सोशल मिडीयाच्या माध्यमातून प्रसिध्दी द्यावी. याकरिता राज्य निवडणूक आयोगाच्या विविध सोशल मीडिया हॅण्डलवरून विविध स्वरूपाच्या पोस्ट करून जनजागृती करण्यात यावी. त्याकरिता आपण आपल्या स्तरावरून निवडणूक आयोगाच्या सर्व हॅण्डल्सवर आयोगाला फॉलो करावे. कळावे, ही विनंती.

संचालक
राष्ट्रीय सेवा योजना

अधिक माहितीकरिता : मा. उप सचिव, राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र यांचे पत्र

# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्रमांक- रानिआ/माजअ-२०२२/प्र.क्र.१/का.१०
नवीन प्रशासकीय भवन, हुतात्मा राजगुरू चौक,
मादाम कामा मार्ग, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : १८ जानेवारी, २०२३

प्रति,
जिल्हाधिकारी (सर्व)
महानगरपालिका आयुक्त (सर्व)

विषय :- दि. २६ जानेवारी ते १० फेब्रुवारी, २०२३ या कालावधीत लोकशाही पंधरवडा साजरा करण्याबाबत.

संदर्भ :- आयोगाचे स्थायी आदेश क्र. रानिआ/रापनों-२०१७/प्र.क्र.१४/का.११, दि. ६ जानेवारी, २०१८

महोदय,

उपरोक्त संदर्भीय स्थायी आदेशानुसार लोकशाही पंधरवडा साजरा करण्यात येतो. लोकशाही, निवडणूक व सुशासन या विषयावर जनजागृती करणे हा या पंधरवड्याचा उद्देश आहे. सदर पंधरवडा यावर्षी मोठ्या प्रमाणावर व्हर्च्युअल स्वरुपात साजरा करण्याचा राज्य निवडणूक आयोगाचा मानस आहे. त्यासाठी राज्य निवडणूक आयोगाच्या विवधि सोशल मीडिया हॅण्डलवरुन विविध स्वरुपाच्या पोस्ट / जनजागृती करण्यात येणार आहे. त्यासाठी आपण आपल्या स्तरावरुन आयोगाच्या सर्व हॅण्डल्सवर आयोगाला फॉलो करावे. त्यावरील पोस्ट रिपोस्ट / रिट्विट कराव्यात. आयोगाच्या हॅण्डल्स खालीलप्रमाणे आहेत :-

Website- https://mahasec.maharashtra.gov.in/
Facebook- https://www.facebook.com/MaharashtraSEC/
Instagram- https://www.instagram.com/maharashtrasec/
Twitter- https://twitter.com/maharashtrasec
Linkdin-https://www.linkedin.com/in/state-election-commission-maharashtra-bb949a227/
Koo- https://www.kooapp.com/profile/MahaSEC
Blogspot- https://mahasecnews.blogspot.com/

आपल्या स्तरावरही तो साजरा करण्यात यावा. त्यासाठी खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी :-

१) लोकशाही पंधरवडा साजरा करण्यासंदर्भातील सूचना आपल्या स्तरावरुन सर्व संबंधित कार्यालय व अधिकाऱ्यांनाही द्याव्यात.

२) आपआपल्या सोशल मीडिया हॅण्डलवरुन लोकशाही व मतदार जागृती संदर्भातील पोस्ट कराव्यात.

३) ७३ व ७४ व्या घटना दुरुस्ती संदर्भात जागृतीपर पोस्ट कराव्यात.

४) स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आगामी निवडणुकांमध्ये मोठ्या प्रमाणावर मतदान करण्यासाठी आवाहन करावे.

५) शाळा, महाविद्यालये, विद्यापीठे इ. च्या विद्यार्थ्यांच्या माध्यमातून अधिकाधिक प्रमाणावर जनजागृती करावी.

आपला,

(के. सूर्यकृष्णमूर्ती)
उप सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र